# हाता-पायांत घालायचे अलंकार
## अलंकारांविषयीचे शास्त्र अन् सूक्ष्मातील प्रयोग !

## मनोगत

प्रभु श्रीरामचंद्र रावणवध करून सीतेची सुटका करतात. 'स्त्रीने वस्त्रालंकारांनी सुशोभित होऊन पतीच्या सन्मुख गेले पाहिजे', असे तेव्हा त्रिजाता नावाची एक राक्षसीण संन्यासिनीचा वेश केलेल्या सीतेला उपदेशिते ! युगायुगांपासून अलंकार हे स्त्रीधर्म, पातिव्रत्य आणि शालीनता यांचे अभिजात दर्शन घडवणारे आहेत. अलंकारांमुळे दैवीतत्त्वाचा लाभ होतो, तसेच वाईट शक्तींच्या त्रासांपासून रक्षण होण्याचे ते एक सुलभ साधनही आहे. दुर्दैवाने सध्याच्या पिढीतील स्त्रियांना अलंकारांचे महत्त्व वाटत नाही किंवा त्या अलंकारांकडे 'फॅशन' म्हणून पहातात. काचेच्या बांगड्या न घालता प्लास्टिकच्या बांगड्या घालणे; एका हातात घड्याळ आणि दुसऱ्या हातात एखादीच बांगडी घालणे; बाहुबंध, मासोळी यांसारखे अलंकार 'ओल्ड फॅशन' म्हणून न वापरणे यांसारख्या अयोग्य गोष्टी रूढ होत आहेत. प्रस्तूत ग्रंथात दिलेले अलंकारांचे महत्त्व, कार्य आणि ते घालण्यामागील सूक्ष्म-स्तरावरील कारणमीमांसा यांमुळे अलंकारांकडे पहाण्याची नवी आध्यात्मिक दृष्टी लाभेल.

सात्त्विक अलंकार लाभदायक असतात, तर तामसिक (आसुरी) अलंकार त्रासदायक असतात. या ग्रंथात सात्त्विक आणि तामसिक अलंकारांच्या संदर्भात सनातन संस्थेच्या एका साधिकेने केलेले सूक्ष्म-ज्ञानाविषयीचे प्रयोग दिले आहेत. प्रयोगात अलंकाराचे छायाचित्र, अलंकाराविषयी साधिकेने केलेले 'सूक्ष्म-ज्ञानाविषयीचे परीक्षण' आणि शेवटी प्रयोगाचा निष्कर्ष दिला आहे. हे प्रयोग करणाऱ्या साधिकेला वाईट शक्तींचा तीव्र त्रास असला, तरी तिच्यातील 'तळमळ' आणि 'जिज्ञासूवृत्ती' या गुणांमुळे तिचे 'सूक्ष्म-ज्ञानाविषयीचे परीक्षण' सत्य आले आहे. 'अध्यात्म' हे अनुभूतीचे शास्त्र असल्याने, वाचकांनी प्रथम अलंकाराच्या छायाचित्राकडे पाहून सूक्ष्मातून काय वाटते, म्हणजे चांगले कि त्रासदायक वाटते किंवा एखादी अनुभूती येते का, हे पहायचा प्रयत्न करावा. प्रत्येकाची प्रकृती, सूक्ष्मातील जाणण्याची क्षमता आणि साधना यांनुसार त्याला प्रयोगात निरनिराळे जाणवू शकते. प्रयोगाद्वारे अलंकार सात्त्विक कि तामसिक, हे ओळखायचा प्रयत्न करावा. त्यानंतर प्रयोगासंबंधीचे 'सूक्ष्म-ज्ञानाविषयीचे परीक्षण' वाचावे. 'सूक्ष्म-ज्ञानाविषयीचे परीक्षण' वाचल्यानंतर

निष्कर्ष वाचण्यापूर्वी स्वतः त्याविषयी चिंतन करावे आणि मगच निष्कर्ष वाचावा. यामुळे वाचकांचा सूक्ष्मातील अभ्यास होऊन अलंकार विकत घेतांना (खरेदी करतांना) 'तो सात्त्विक कि तामसिक आहे', हे ओळखता येण्यास साहाय्य होईल.

अलंकारांचा अध्यात्मशास्त्रीय लाभ होण्यासाठी सर्वच अलंकार घालणे आवश्यक नसून आर्थिक परिस्थितीनुसार मोजकेच अलंकार घातले तरी चालते. सोन्याच्या अलंकारांपेक्षा चांदीचे अलंकार परवडण्यासारखे असतात. अलंकार घालण्यामागे भाव अधिक महत्त्वाचा असतो, हे लक्षात ठेवावे.

या ग्रंथाच्या वाचनाने अलंकारधारणाचे महत्त्व लक्षात येऊन अलंकाररूपी अमूल्य ठेवा देणाऱ्या हिंदु धर्माची महानताही लक्षात येवो, ही श्रीगुरुचरणी प्रार्थना ! - **संकलक**

## अलंकारांची आध्यात्मिकदृष्ट्या शुद्धी करण्याचे महत्त्व

अलंकार परिधान करण्यामागे सौंदर्यवृद्धीपेक्षा आध्यात्मिक लाभ हा उद्देश अधिक महत्त्वाचा आहे. अलंकार परिधान केल्याने शरिराच्या त्या त्या ठिकाणी वाईट शक्तींना शरिरात प्रवेश करण्यास प्रतिबंध होतो. सोने-चांदीच्या सात्त्विकतेमुळे हा परिणाम साधला जातो. यामुळेच वाईट शक्ती अलंकारांना विरोध करतात आणि त्यांच्यावर काळे आवरण आणतात. हे सूक्ष्मातून घडत असल्याने ते सामान्यांना डोळ्यांनी दिसत नाही आणि 'अलंकार स्वच्छ आहेत', असे वाटते; पण प्रत्यक्षात तसे नसते. त्यामुळे अलंकार नियमितपणे स्थूल आणि सूक्ष्म दृष्ट्या (आध्यात्मिकदृष्ट्या) स्वच्छ करणे गरजेचे आहे. अलंकार रिठ्याने (स्थुलातून) स्वच्छ करतांना त्यांवरील काळे आवरण जाण्यासाठी प्रार्थना करावी अन् त्यांना विभूती लावून ते धुवावेत. वाईट शक्तींचा त्रास असलेल्यांनी अलंकार प्रत्येक आठवड्याला अशा पद्धतीने स्वच्छ करावेत अन् नसलेल्यांनी ते प्रत्येक महिन्याला स्वच्छ करावेत. **( संदर्भ : सनातनचा ग्रंथ 'स्त्री-पुरुषांचे अलंकार' )**

# अनुक्रमणिका

(काही वैशिष्ट्यपूर्ण सूत्रे '*' या चिन्हाने दर्शवली आहेत.)


**१. बाहुबंध ( बाजूबंद )** **१८**

* बाहुबंध बांधण्याच्या संदर्भात केलेले सूक्ष्म-ज्ञानाविषयीचे प्रयोग २०

**२. बांगड्या ( कंकणे )** **२३**

* महत्त्व २३
* बांगड्यांचे प्रकार - पाटल्या, बिलवर, तोडे अन् काचेच्या बांगड्या ३५
* प्लास्टीकच्या, काचेच्या आणि सोन्याच्या बांगड्या घालून केलेले सूक्ष्म-ज्ञानाविषयीचे प्रयोग ४२
* पिचलेली (तुटलेली) बांगडी हातात का घालू नये ? ४७
* स्त्रियांनी डाव्या हातात घड्याळ असल्यामुळे केवळ उजव्याच हातात बांगड्या घालणे अयोग्य का ? ४८
* हातात बांगड्या नि घड्याळ घालून केलेले सूक्ष्म-ज्ञानाविषयीचे प्रयोग ४९
* वाईट शक्तींचा त्रास असलेल्या साधिकांच्या बांगड्यांविषयीच्या आवडीनिवडी आणि अनुभव ५७
* बांगड्यांमुळे आध्यात्मिक उपाय होण्यासंदर्भातील अनुभूती ६२

**३. अंगठी** **६४**

* अंगठी हाताच्या अनामिकेत का घालावी ? ६४
* तामसिक अंगठी घातल्यावर साधिकेला विविध त्रास होणे ६७

**४. पैंजण** **६८**

* महत्त्व आणि लाभ ६८
* पैंजण, जोडवी आणि मासोळी हे अलंकार चांदीचे का असतात ? ६९
* पैंजणांच्या संदर्भात केलेले सूक्ष्म-ज्ञानाविषयीचे प्रयोग ७०
* पैंजणांसंदर्भात काही साधकांना आलेले वैशिष्ट्यपूर्ण अनुभव आणि त्याची कारणमीमांसा ७५

५. **जोडवी** ७७

* महत्त्व आणि लाभ * जोडवी घालून केलेला प्रयोग ७८

६. **मासोळी** ८१

* मासोळ्यांच्या संदर्भात केलेले सूक्ष्म-ज्ञानाविषयीचे प्रयोग ८२

७. **विविध अलंकारांचा विचार मनात आल्यावर साधिकेला त्यांचे जाणवलेले परिणाम आणि कार्य** ८५

८. **अलंकारांशी संबंधित देवता, देवतेचा कार्यरत होणारा भाव, अलंकार परिधान करणारा आणि पहाणारा यांचा भाव** ८७

९. **आध्यात्मिक त्रास असणारे अन् नसणारे जीव यांना अलंकार परिधान केल्यामुळे तारक आणि मारक स्तरांवर होणारे लाभ** ८७

१०. **विविध अलंकारांमुळे जिवाला येणाऱ्या अनुभूतींचे प्रमाण** ८८

११. **आचारधर्मानुसार अलंकार त्या त्या स्थानीच घालण्यामागचे महत्त्व विशद करणारे सूक्ष्म-ज्ञानाविषयीचे प्रयोग** ८९

## सूक्ष्म परीक्षणातील सूत्रे आणि अध्यात्मशास्त्रातील सिद्धांतांनुसार असलेले ज्ञान यांतील भेदाचे कारण

प्रस्तुत ग्रंथात सनातन संस्थेच्या एका साधिकेने अलंकारांच्या संदर्भात केलेली सूक्ष्म परीक्षणे दिली आहेत. काही ठिकाणी सूक्ष्म परीक्षणात जाणवलेले ज्ञान आणि अध्यात्मशास्त्रातील सिद्धांतांनुसार असलेले ज्ञान यांत भिन्नता दिसून येते. याचे एक उदाहरण म्हणजे, एका अलंकाराचे परीक्षण करतांना साधिकेला निळ्या रंगाच्या संदर्भात मारक तत्त्वाची अनुभूती आली. वस्तूतः अध्यात्मशास्त्रातील सिद्धांतानुसार निळा रंग हा तारक तत्त्वाचे प्रतीक आहे. येथे लक्षात घ्यावयाची महत्त्वाची गोष्ट म्हणजे, अध्यात्मशास्त्रातील सिद्धांत हे त्रिकालाबाधित असतात (त्यांच्यात कधीच परिवर्तन होत नाहीत). याउलट सूक्ष्म परीक्षणात जाणवलेले ज्ञान हे त्या साधकाचा भाव, त्याची सूक्ष्मातील जाणण्याची क्षमता, त्याच्या प्रकृतीनुसार त्याला आवश्यक असणारे तत्त्व आदी घटकांनुसार पालटणारे असते.